IMPACT FACTOR SJIS 2015 - 5.403

ISSN 2319-4766

SRJIS

# Issues of Farmers' Suicides in India : Past, Present and Future



Editor

**Dr. T. V. Munde**

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

IMPACT FACTOR SJIF (2015) – 5.403

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

Pathri Taluka Shikshan Prasarak Mandal's

**KATRUWAR ARTS, RATANLAL KABRA SCIENCE & B. R. MANTRI COMMERCE COLLEGE,**

Manwath – 431 505 Dist. Parbhani

*(NAAC Reaccredited 'B' Grade with 2.65 CGPA)*

University Grants Commission, WRO, Pune Sponsored

Two Days National Seminar

ON 21 & 22 APRIL, 2017

# Issues of Farmers' Suicides in India: Past, Present and Future

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

IMPACT FACTOR SJIF (2015) – 5.403

**Chief Editor**

Principal Dr. A. B. Chindurwar

**Editor**

Dr. T. V. Munde

**Editorial Board**

Dr. K. B. Patole
Dr. S. K. Shinde
Dr. Sharda Raut
Dr. P. S. Landage
Sunita Kukade
V. P. Jadhav
Dr. C. P. Vyas

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | प्राध्यापकाचे नाव व पेपरचे शीर्षक | पान. क्र. |
|---|---|---|
| 79 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास<br>*डॉ. बी. डी. इंगळे* | 277-280 |
| 80 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अर्थशास्त्रीय अभ्यास<br>*डॉ. अनिल दि.वाडकर* | 281-285 |
| 81 | भारतीय शेतकऱ्याच्या आत्महत्येस जबाबदार घटक<br>*प्रा. कविता प्रल्हादराव हिरुळकर* | 286-290 |
| 82 | शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय : वाशिम जिल्ह्याच्या संदर्भात एक अध्ययन<br>*डॉ. एच. आर. तिवारी* | 291-295 |
| 83 | भारतातील भोतकऱ्याच्या आत्महत्येची वर्तमान,भुत व भविश्यातील समस्या<br>*प्रो.डॉ.अवथरे जयेश मो.* | 296-300 |
| 84 | विदर्भातील जलसिंचनाची स्थिती आणि अडचणी<br>*माधव चोले* | 301-304 |
| 85 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यास्थितीचे अध्ययन<br>*डॉ. वन्ने मोहन भूजंगा* | 305-307 |
| 86 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे व उपाययोजना - एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले* | 308-313 |
| 87 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या :आत्महत्या कारणे व उपाय<br>*Dr. Ashok P. Tiparse* | 314-318 |
| 88 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या घटकांचा अभ्यास<br>*प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे* | 319-321 |
| 89 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या-समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. चव्हाण एस.जी.* | 322-323 |
| 90 | भारतातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना<br>*डॉ. तुकाराम वैजनाथराव पोवळे* | 324-328 |
| 91 | ग्रामीण अर्थव्यवस्था : कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्याच्या आत्महत्या<br>*प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे* | 329-333 |

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINART STUDIES IMPACT FACTOR SJIF 2015 – 5.403 ISSN: 2319-4766

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

९१.

# ग्रामीण अर्थव्यवस्था : कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्याच्या आत्महत्या

**प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे**

*संशोधन मार्गदर्शक सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख, ". रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी*

शेतकरी जगला तरशेती टिकेल; शेती टिकली तरभारत विकसित देशाच्या यादीतजाऊन बसेल; यासाठी मातीतून सोनं पिकविणाऱ्यां बळीराज्याच्याहाताला बळ देणे त्याला सर्वोतपरी मदत करणे; अन्नदात्याला वाऱ्यावर न सोडने; हे सर्वाचे कर्तव्य आहे.

**प्रस्तावना (Introduction) :-**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असल्यामुळे शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. शेती हे उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. शेतीमुळेच देशातील उद्योंगाचा विकास करणे शक्य होते. अनेक उद्योगांना लागणारा कच्चा मालाचा पुरवठा शेती क्षेत्रातून केला जातो. शेती मालाच्या निर्यातीमुळे परकीय चलन प्राप्त होते. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत शेती ही महत्त्वाची भूमिका पार पाडते. शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडलेला निसर्गाच्या लहरीपणामुळे दिसून येतो.

भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतीचा विकास करणे आवश्यक आहे. शेतीच्या विकासामध्ये शेतीची उत्पादकता किती आहे हे पाहणे अतिशय आवश्यक असते. उत्पादकता म्हणजे उत्पादन करण्याची क्षमता होय. ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीची उत्पादकता कमी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी फारशे प्रयत्न केले गेले नाहीत. परंतू स्वातंत्र्यानंतर सरकारने उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक धोरणे आखली आहेत. शेती या व्यवसायाला आज वाईट दिवस आलेले आहेत. निसर्गाची अवकृपा तर कधी महाकृपा यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. शेतीमालाला योग्य भाव नाही. शेतीमालाच्या बाजारभावाची अनिश्चितता, पाण्याच्या गंभीर प्रश्न, वीजभारनियमन, कृषी साधनांचा अभाव, मजूरांची चणचण व कर्जाचा बोझा या बाबीमुळे आजचा शेतकरी हवालदिल झाला आहे आणि त्याचा परिणाम शेतीकडे दुर्लक्ष करण्याकडे होत आहे. शेती पिकत नाही पिकलं तर विकत नाही. म्हणून खेड्यातला शेतकरी शेती व्यवसाय सोडून शहराकडे धाव घेत आहे. खेडी ओस पडून शेतीतील उत्पादन घटले आहे. शेतकऱ्याच्या शेतीत जो कांही माल पिकतो तो माल व्यापारी मनमानेल त्या भावाने घेतो. त्यामुळे श्रम जास्त करुन, खर्च जास्त करुनही त्याच्या मालाला योग्य भाव नाही. खर्च जास्त व उत्पन्न कमी आणि मिळकत कमी अशा अवस्थेत शेतकरी आहे. नैसर्गिक आपत्तीने शेतकरी खचून जातो. तो हताश, निराश होतो व वेळप्रसंगी त्याला आपल्या जिवावर एखादी दूर्दैवी प्रसंग ओढवून घेतो. याचे विपरीत परिणाम त्यांच्या कुटूंबियांना भोगावे लागतात. वेळप्रसंगी शेती विकून टाकावी लागते. शेती करण्यासाठी पुरेसे साहित्य नसते. शेती कसण्यासाठी आर्थिक तरतूद नसते. शेती कर्जावर किंवा उधारीवर कसावे लागते. शेती ही अर्थार्जनाचे साधन आहे याचा विश्वास यापिढीतील काही थोडक्याच शेतकऱ्यांना आहे. शेतकऱ्याच्या पोराला शहरी जीवन अधिक सुखावह वाटते. आरामात पैसा मिळाला पाहिजे. अशी भावना त्याच्या मनात निर्माण होत आहे. आज शेतकऱ्याची पोरं शहरातील हॉटेलात कपबशा विसळायचं काम करतील, वेळ पडली तर एखाद्या भजी - पावाच्या गाड्यावर आठ तास उभ राहतील. परंतु आपल्या शेतीत दोन - चार तास काम करायला तयार होत नाहीत अशी सद्यस्थिती बनली आहे.

**संशोधनाचा उद्देश :-**

सदर शोध निबंध खालील उद्देश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे.

- ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी उत्पादकता स्पष्ट करणे.

- ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषीची कमी उत्पादकतेची कारणे शोधणे.
- कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी उपाय सूचविणे.
- निष्कर्ष काढणे.

**अभ्यास पद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे. या दुय्यम माहितीत दैनिक वर्तमान पत्रातील लेख, शोध निबंध, संदर्भ ग्रंथ यांचा आधार घेतलेला आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी उत्पादकता :-**

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे शेतीचा विकास करणे आवश्यक आहे. शेतीच्या विकासात शेतीची उत्पादकता किती आहे हे पाहणे अतिशय आवश्यक असते. आज शेतीला मजूर मिळत नाहीत. विहीरीत पाणी असून भारनियमनामुळे शेतीला पाणी देणे शक्य नाही. शेती मालाला किफायतशीर भाव नाही, अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान होते. यामुळे शेती व्यवसाय फार मोठ्या अडचणीत सापडलेला आहे. आज शेती व्यवसाय तोट्यात आहे. शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहे. शेती व्यवसाय तोट्यात जाण्याची अनेक कारणे आहेत. शेतीत अनेक संशोधने करण्यात आले. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक बी-बीयाणे, रासायनिक खते, यंत्र सामुग्री याचा वापर करण्यात आला तरीही शेतीची उत्पादकता वाढविण्यात यश मिळाले नाही. कारण उत्पादकतेवर अनेक नैसर्गिक, सामाजिक, तांत्रिक घटकांचा परिणाम होत असतो.

**भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे :**

**१) शेतकऱ्यांचे शेतीकडे दुर्लक्ष :-**

कुटूंब प्रमुख आपल्या शेतीत नांगरणी, कोळपणी, वखरणी, पाणी देणे, सेंद्रीय खताचा वापर, तृण काढणे इत्यादीचे नियोजन करुन राबत होता. त्यामुळे शेतीतून भरपूर उत्पन्न निघत होते. परंतु शेतीकडे लक्ष द्यायला वेळ नाही. ग्रामीण भागात शेत मालक आपली शेती व त्याची कामे नोकर, चालकावर सोपवितो. यामुळे वेळेवर पिकांना खत, पाणी, पुरवितले जात नाही. निदंणी, फवारणी वेळेवर होत नाही. याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर होतो. त्यामुळे शेती व्यवसाय तोट्यात येतो.

**२) शेतीमालाला हमी भाव नाही.**

निसर्गाच्या आपत्तीवर मात करुन शेतकरी वर्ग शेतीतून उत्पन्न काढतो. कर्ज काढून पिकांना खत, पाणी देतो. परंतु ज्यावेळी पिके चांगली येऊन मोठ्या प्रमाणात उत्पादन होते त्यावेळी मालाला भाव नसतो. त्यामुळे शेतकऱ्याला आपला माल स्वःस्तात विकावा लागतो. कांहीवेळा उत्पादीत माल अक्षरशः रस्त्यावर व उकिरड्यावर फेकून द्यावा लागतो. मोर्चे, आंदोलने करुनही हमी भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्याची मेहनत, वेळ व श्रम वाया जाते. म्हणून शेतकरी आर्थिक दृष्ट्या पार खचून जातो.

**३) शेतीसाठी लागणाऱ्या सुविधांचा अभाव :-**

शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी अनेक सोयी सुविधांचा मुबलक पुरवठा होणे आवश्यक असते. वीज, पाणी, आवश्यक आहे. विजेची कमतरता असल्यामुळे विजेच्या उपकरणांचा वापर करता येत नाही. जलसिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे योग्य पाणीपुरवठा होऊ शकत नाही. या सर्व प्रकारच्या सुविधांच्या अभावामुळे शेतीची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत आहे.

**४) नैसर्गिक आपत्ती :-**

भारतातील शेती मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस, हवामान यासारख्या घटकांमध्ये बदल घडून येतात. नैसर्गिक आपत्ती नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी हात धुवून लागते. देशातील एकावेळेस कांही भागात दुष्काळ पडतो आणि बऱ्याच ठिकाणी अवकाळी पाऊस पडतो. दुष्काळ व अवकाळी पाऊसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडते. पाऊस जास्त झाला तर, वावरातच पिक सडतात आणि पाऊस कमी झाल्यास हाती तोंडाला आलेलं पिक उभ वावरात वाळतं यावावी शेतकऱ्यासाठी चिंतनीय आहेत.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**५) विपणन पद्धत शेतकऱ्यांची लूट करणारी :-**

शेतमालाचे उत्पादन झाल्यानंतर त्यामालाची विक्री करणे हे सर्वात महत्त्वाचे काम असते. शेतमालाला मिळणाऱ्या किंमतीवर शेतीची उत्पादकता अवलंबून असते. भारतात शेतमाल विक्रीत अनेक दोष आढळून आहेत. वाहतूकीच्या सोईचा अभाव, गोदामाचा अभाव, वजन मापनातील दोष, दलालाकडून होणारी पिळवणूक अशा अनेक दोषांमुळे शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही. व्यापारी व मधले दलाल यांचेच हित मोठ्या प्रमाणात साधले जाते. मालाची किंमत ठरविताना, मालाचे मोजमाप करताना व मालाचे पैसे देताना शेतकऱ्यांचे हित पाहिले जात नाही. यामुळे शेतकरी व मालाचे पैसे देताना शेतकऱ्यांचे हित पाहिले जात नाही. यामुळे शेतकरी आपल्या कष्टाचे चीज होत नाही म्हणून हताश व निराश होवून शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करतो. निराश होऊन आत्महत्येचा विचार मनात आणतो.

**६) आधुनिक तंत्रज्ञान, रासायनिक खते व बी - बीयाणांचा अभाव :-**

भारतीय शेतकरी आजही पारंपारिक तंत्रज्ञानाचा, सेंद्रिय खतांचा, बियाणांचा वापर करत आहे. या जुनाट तंत्रज्ञानामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ होऊ शकत नाही. परंपरागत तयार होणाऱ्या बियाणांचाच वापर करतो. त्यामुळे त्यात जास्त उत्पादन देण्याची क्षमता नसते. शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे शेतकऱ्यांना खते पुरवठादारांकडून वेळेवर मिळत नाहीत. वेळेवर खते व बी- बियाणे मिळत नसल्यामुळे पाहिजे तसे उत्पादन शेतीतून मिळत नाही.

**७) पिकांवरील विविध रोगांचा वाढता प्रादुर्भाव :-**

बदलत्या नैसर्गिक परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे रोग पडतात. औषध फवारणी कांही शेतकऱ्यांकडून वेळेवर होत नाही. यामुळे त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. उत्पादन कमी होणे, माल निकृष्ट प्रकारचा निघणे, भाव कमी मिळणे या बाबी शेतकऱ्यांच्या पाचविलाच पूंजलेल्या आहेत. यामुळे शेतकरी वर्ग शेतीकडे दुर्लक्ष करतो खर्च वाढतो.

**८) शेतजमिनीचे आकार :-**

शेत जमिनीच्या आकाराचा उत्पादकतेवर खूप मोठा परिणाम होत असतो. शेतजमिनीचा आकार लहान असल्यास कोणत्याही आधुनिक यंत्र सामुग्रीचा वापर करता येत नाही. भारतातील शेतकऱ्यांकडे शेतीचा आकार अतिशय कमी होत आहे. सरासरी ५९ टक्के शेतकऱ्यांकडे १ हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र आहे. शेतीचे विभाजन व तुकडीकरण फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. शेतीचा आकार लहान झाल्यामुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य होत नाही.

**९) वाढती लोकसंख्या :-**

भारताची आजही ६७% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. भारताची वाढती लोकसंख्या ही भरमसाठ असल्यामुळे शेतीचे क्षेत्र कमी होत आहे. ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढली त्या प्रमाणात रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या नाहीत. शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा भार वाढत गेला. त्यामुळे जमिनीचे क्षेत्र कमी आणि अवलंबून असणारी लोकसंख्या जास्त यामुळे दिवसेंदिवस शेतीची उत्पादकता कमी होत गेली.

**१०) शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचत नाहीत :-**

शेती विकासासाठी व शेतीतील उत्पन्न वाढीसाठी शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना आहेत. परंतु या सर्व योजना तळागाळातल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत यामुळे शेतीचा विकास होत नाही.

**शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

शेतकऱ्याची परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीची उत्पादकता वाढणे महत्त्वाचे आहे. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक धोरणे आखण्यात आली. त्या विविध धोरणांची यशस्वीरीत्या अंमलबजावणीही करण्यात आली परंतु त्या धोरणांचा परिणाम झाला नाही. त्यामुळे आजही शेतीची उत्पादकता कमीच आहे. शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाल्याशिवाय त्यांच्या उत्पादनात वाढ होणार नाही. भारतातील अनेक राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेती क्षेत्राची असमाधानकारक कामगिरी व शेतकऱ्यांमधील वाढता कर्जबाजारीपणा

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



भारतीय विकासाच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या अन्य घटक शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत. [illegible] आवश्यक आहे. त्यासाठी शेतीची उत्पादकता वाढणे आवश्यकच आहे.

**१) शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे :-**

शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढल्यामुळे शेतीचे विभाजीकरण व तुकडीकरण होऊन त्याची कार्यक्षमता कमी होत आहे. वाढत्या लोकसंख्येवर शासनाने अनेक धोरणे आखणे आवश्यक आहे. सतत वाढणारी लोकसंख्या ही देशापुढील सर्वात महत्त्वाची समस्या आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या विविध समस्यांच्या मुळांशी लोकसंख्या वाढ हेच प्रमुख कारण आहे.

**२) जलसिंचनाच्या सुविधेत वाढ :-**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. शेतीसाठी पाणी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी अधिकाधिक शेत जमिनीला पाणी पुरवठा उपलब्ध होणे गरजेचे आहे. निसर्गावर अवलंबून असणाऱ्या कोरडवाहू जमिनीत फारसे उत्पादन होत नाही. बारमाही पिके घेता येत नाहीत. पाणी अडवा आणि पाणी जिरवा ही योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. ठिबंक व तुषार योजनेचा वापर करणे गरजेचे आहे.

**३) शेतीविषयक संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे :-**

कृषी विद्यापीठे व संशोधन संस्थामध्ये शेतीविषयक संशोधन सातत्याने चालू असते. या संस्थात भारतीय शेतीसाठी उपयुक्त संशोधन होणे महत्त्वाचे आहे. हे झालेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून या संशोधनाचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यास मिळाल्यास उत्पादन वाढेल. त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास उपयोग होऊन शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबतील.

**४) पिकांचे नियोजन करणे :-**

शेतीच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी राज्य - जिल्हा - तालुका - गावपातळी वर पीक नियोजन करणे आवश्यक आहे. नियोजनाच्या अभावामुळे शेतमाल पुरवठ्यात चढ - उतार होवून किंमतीत अस्थैर्य निर्माण होते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर प्रतिकुल परिणाम होऊन त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत जातो. पीक सुविधा, जमिनीची प्रत, हवामान, बाजारपेठ मागणी इत्यादी विचार करुन पीक नियोजन करावे.

**५) शेतमालाच्या उत्पादन खर्चावर आधारीत भाव :-**

शेतमालाला योग्य किंमत मिळाली तरच त्याला उत्पादनात वाढ करण्यास प्रोत्साहन मिळेल. शेतमालाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात चढउतार होत असतात. याचा शेतकऱ्यांच्या मानसिक स्थितीवर प्रतिकुल परिणाम होतो. त्यासाठी शेतीला योग्य भाव मिळावा व शेतीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी म्हणून सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**६) वित्तपुरवठ्याच्या सुविधेत वाढ :-**

भारतात शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक आहे. त्यामुळे शेतीत कोणत्याही सुविधा करणे त्यांना शक्य होत नाही. गरज पडल्यास तो सावकाराकडून कर्ज घेतो. परंतु त्यांचा व्याजाचा दर जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांना ते परवडत नाही. सहकारी बँका, व्यापारी बँका, भूविकास बँका, नाबार्ड यांच्याकडून कमी वेळात योग्य वित्तपुरवठा करुन देणे आवश्यक आहे.

**७) आधुनिक बी - बीयाणांचा वापर :-**

शेतीमध्ये आधुनिक बी - बीयाणांचा वापर करुन शेतीच्या उत्पादकतेत वाढ घडून आणता येते. यासाठी आधुनिक आणि चांगल्या दर्जाच्या बियाणांचा स्वस्त आणि मुबलक पुरवठा करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ही बियाणे वापरण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**८) आधुनिक व योग्य रासायनिक व कृत्रीम खतांचा वापर :-** आधुनिक बी - बियाणांचा वापर करण्यासाठी आणि त्यातून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी चांगल्या रासायनिक कृत्रीम खताचा वापर करणे आवश्यक आहे.

शेतीची कार्यक्षमता टिकविण्यासाठी आवश्यक तेवढा खतांचा वापर करणे आवश्यक असते. रासायनिक खतांचे महत्व शेतकऱ्यांना सांगून त्यांना ही खते वापरण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**९) शेतीचे यांत्रिकीकरण :-**

भारतात पूर्वीपासून शेती मानवी श्रम आणि प्राण्यांच्या साह्याने केली जात आहे. यंत्राचा वापर खूप कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत आहे. शेतीत यंत्राचा वापर केल्यास उत्पादकतेत वाढ होते. कापणी, पेरणी, मळणी, औषध फवारणी यासाठी यंत्राचा वापर केल्यास शेतीच्या उत्पादकतेत वाढ होऊन उत्पादनातही वाढ होईल.

**निष्कर्ष :-**

भरपूर शेती असून सुद्धा एखादा शेतकरी तिसऱ्या श्रेणीतील कर्मचाऱ्याची बरोबरी करु शकत नाही. शेतकऱ्यांची ही दयनीय स्थिती आहे. शेतकऱ्यांना भरपूर धान्य होऊन सुद्धा त्या धान्याला योग्य भाव मिळत नाही. शेतकऱ्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन व्यापारी वर्ग श्रीमंत होत चालला आहे. शेतमालाला भाव कमी असूनही शेतकऱ्यांना धान्य विकावे लागते. 'गरजवंताना अक्कल नसते'. शेतकऱ्याला अंगावर फाटकी बनी आणि फाटक्या धोतराशिवाय नेसावयास मिळत नाही.

शेतकऱ्याच्या आशेची किरण फक्त दोनच आहेत. निसर्ग आणि शासन निसर्ग सतत शेतकऱ्यावर रूसून असतो जेव्हा तो प्रसन्न होतो तेव्हा शासन रूसते. कृषीक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा १०० टक्के वापर होणे अनिवार्य आहे. तरच भारतीय शेतकरी जिन्सपँट, शर्टावर वावरताना दिसेल. दिवसेंदिवस परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. नवनवे शेतीतंत्र, नवनवे अवजार, बी - बियाणे, पिकांना पाणी देण्याच्या नवनव्या पद्धती, खत फवारणीची औषधे याचा स्वीकार करणे काळाची गरज आहे. परंपरागत शेती तोट्यात व घाट्यात चालणारी शेती आता नको आहे. नव्या बदलांना नव्या पद्धतींना स्वीकारणे व त्यानुसार शेती करणे हा सर्वोत्तम उपाय होय.

**संदर्भग्रंथ सूची :-**

*डॉ. एस. के. ढगे : भारतीय अर्थव्यवस्था (समस्या आणि भवितव्य, के. एस. पब्लिकेशन, पुणे ३०.*
*डॉ. बी. जी. खटाळ : भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन, श्रद्धा पब्लिकेशन, सोलापूर.*
*डॉ. मुलानी व इतर : भारतीय अर्थव्यवस्था (समस्या व भवितव्य), कैलास पब्लिकेशन्स, पुणे.*
*धोंडीराम सिंह राजपूत : शेती व्यवसाय तोट्यात जाण्याची कारणे दै. लोकपत्र दि. ०५.१०.२०१५ पान ४.*

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani